## चकवा - भाग २

जनी आता वीस-बावीस वर्षांची तरुणी झाली होती. अस्मितावहिनींच्या जुन्या साड्या नेसू लागली होती. केसाचा बुचडा जाऊन वेणी घालू लागली होती. वहिनींचं पाहून तोंडाला पावडर, कपाळाला टिकली लावत होती. सुंदर नसली तरी जनी आता देखणी नक्कीच दिसत होती. आपण मुक्या आहोत, आई वडिलांचं छत्र नाही. एक भाऊ आहे. पण तो दारूच्या आहारी गेलेला असतो. कधीतरी उगवतो आणि पैसे घेऊन जातो. डॉक्टर साहेबांनी आणि त्यांच्या आईने आसरा दिला, नंतर वहिनींनी प्रेम, माया दिली म्हणून आपलं निभतंय. पण आपलं लग्न होण्याची शक्यता नाही. हे जाणवलेली आणि मातृसुलभ भावना मनांत निर्माण झालेली जनी अनयवर निर्व्याज प्रेम करू लागली होती.

अनय दीड वर्षाचा झाला होता. आता तो बराच सुटाही झाला होता. स्वतःच्या खेळण्यांशी खेळणं, चित्रांची पुस्तकं बघणं असं त्याला आवडू लागलं होतं.

एके दिवशी वर्तमानपत्र वाचत असताना अस्मिताचं लक्ष पेपर मधल्या नाटकांच्या जाहिरातींवर गेलं.

एका नवीन नाटकाची जाहिरात होती. रत्नागिरीला नाटकाचा प्रयोग होता. नाटकात प्रमुख भूमिकेत राहुलचं नाव होतं. यापूर्वीही काही नाटकांच्या जाहिरातींमधून हिरो म्हणून राहुलचं नाव तिने बरेचदा वाचलं होतं. पण आत्तापर्यंत रत्नागिरीला त्याच्या नाटकाचा प्रयोग लागला नव्हता. आता एवढ्या दिवसानंतर राहुलला पाहायला मिळेल. अनायसे नाटकाच्या प्रयोगाच्या निमित्ताने तो रत्नागिरीला येतोय तर त्याला बघता, भेटता येईल असा विचार करून अस्मिताने डॉक्टरांना नाटकाला जाऊया का, म्हणून विचारलं. नाहीतरी प्रेग्नंट असल्यापासून तिचं कुठे बाहेर जाणं झालं नव्हतं. त्यामुळे डॉक्टरांनीही यायचं कबूल केलं आणि तिकिटही काढून आणलं.

ती नाटक पाहायला गेली. जवळजवळ तीन-चार वर्षानंतर ती राहुलला पहात होती. तिला खूप आनंद झाला होता. मध्यंतरानंतर अचानक हॉस्पिटलमधून फोन आल्यामुळे डॉक्टरांना एका पेशंटला पाहण्यासाठी अर्जंटली हॉस्पिटलला जावं लागलं. अस्मिता मात्र थांबली. तिने एकटीने पुढचं संपूर्ण नाटक पाहिलं. नाटक संपल्यानंतर बॅकस्टेजला ती राहुलला भेटायला गेली.

त्याच्याभोवती लोकांचा गराडा होता. तो ओसरल्यावर राहुल स्वतःहून तिच्याजवळ आला. बोलला. तिची चौकशी केली. नाटक कसं वाटलं म्हणून विचारलं. त्याचा राग निवळला असल्याचं तिला जाणवलं. तिला बरं वाटलं. मनांत कसलीही कटुता न ठेवता तो तिच्याशी बोलत होता. थिएटरवरून

ती एकटी रिक्षाने घरी जाणार आहे हे कळालं तेव्हा त्यानं तिला स्वतःच्या गाडीने तिच्या बंगल्यापाशी सोडू का म्हणून विचारलं.

बंगल्याच्या थोडं आधी कोपऱ्यावर ती त्याच्या गाडीतून उतरली.

तो म्हणाला, "माझा मुक्काम अजून दोन दिवस आहे इथे. बाकीचे कलाकार आमच्या कंपनीच्या बसने पुढे वेंगुर्ल्याला  जाणार आहेत. मी दोन दिवसानंतर जाणार आहे. हॉटेल सम्राटमध्ये उतरलोय. तू उद्या परत भेटशील का मला? येशील का प्लीज? तुझ्याशी खूप बोलायचंय. हा माझा फोन नंबर. मी वाट पाहतो तुझी."

त्याच्या डोळ्यात आर्जव होतं. ती नाही म्हणू शकली नाही.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी डॉक्टर क्लिनिकमध्ये गेल्यावर आईंना काहीतरी थाप मारून, जनीला अनयवर लक्ष ठेवायला सांगून ती राहुलला भेटायला हॉटेल सम्राटमध्ये गेली.

हॉटेलच्या रूमवर तो तिच्याशी खूप भरभरून बोलत होता. त्याचा स्ट्रगल, ह्या इंडस्ट्रीतली अचिव्हमेंट सगळं ऐकताना तिला भरून आलं. त्याने अजूनही लग्न केलं नसल्याचं त्याच्या बोलण्यातून तिला समजलं. गप्पांच्या ओघात त्याने गेल्या चार वर्षाच्या त्याच्या डायऱ्या तिला दाखवल्या. तिच्या लक्षात आलं, प्रत्येक पानावर 'प्रिय अस्मिता' असं लिहून मग पुढचा मजकूर लिहिला होता. त्याच्या प्रत्येक दिवसाची सुरुवात तिच्या आठवणीने होत होती. रोज रात्री झोपण्यापूर्वी डायरी लिहायची आणि त्या दिवसाच्या खास घटना नमूद करायच्या ही सवय त्याने स्वतःला लावून घेतली होती. त्याच्या त्या डायऱ्या चाळून तिच्या हे लक्षात आलं. गेल्या चार वर्षात प्रसिद्धीच्या शिखरावर पोचूनही तिच्या आठवणीवाचून त्याचा एक दिवसही सरला नव्हता.

तिने डायरीचं आदल्या दिवशीचं पान उघडलं. राहुलने लिहिलं होतं, "आज अस्मिता माझं नाटक पाहायला आली होती. तिला माझं नाटक, माझं काम आवडलं. आजचा दिवस माझ्यासाठी 'खास' आहे. आज मी खूप काही अचिव्ह केलं याचं समाधान मला मिळालं. आता यापुढे..." एवढं लिहून राहुलने ते वाक्य तसंच अर्धवट सोडलं होतं.

सुरवातीला नाटकात मिळेल ते काम करून त्याने पैसे कमावले होते. आणि आता तो नट म्हणून खूप लोकप्रिय झाला होता. त्याची बहुतेक सर्वच नाटकं गाजली होती, गाजत होती. भरपूर नावलौकिक, पैसा त्याने कमावला होता. एवढं सगळं कमावून तो तिला अजिबात विसरला नव्हता.

ती मनातून खूप सुखावली त्यांच्या भेटीत त्याने कुठल्याच मर्यादेचं उल्लंघन केलं नाही. त्याने उठून आपल्याला घट्ट कवेत घ्यावं, आपल्यावर चुंबनांचा वर्षाव करावा असं तिला वाटलं. पण तो मात्र एखाद्या व्रतस्थ संन्यासासारखा वागला.

ती हॉटेलमधून निघाली तेव्हा त्यानं म्हटलं, “मी उद्या इथून जाणार आहे. माझा नंबर मी तुला दिलाय. तू फोन करशील ना मला? रोज एकदा तरी फोन कर. प्लीज...फोनवर नुसता तुझा आवाज ऐकून सुद्धा मी समाधानी राहीन. मला सतत काहीतरी करायची ऊर्जा मिळत राहील. करशील ना फोन?”

राहुलच्या बोलण्यानं अस्मिता मनातून खूप सुखावली. आणि तिला अपराधीही वाटलं.

ती घरी परतली पण मनांत एक हुरहुर घेऊन...

राहुलचं आपल्यावरचं प्रेम आठवून मग रोजच ती त्याला फोन करू लागली. डॉक्टरांच्या नकळत. एखाद्या दिवशी तिला फोन करायला जमलं नाही तर तो नर्व्हस होई. तिला ते जाणवे. छोटा अनय, आपलं घर -संसार साऱ्याचा तिला जणू विसर पडला होता .

तिच्यातला बदल डॉक्टरांच्या लक्षात आला होता. पण त्यांनी तिला काही विचारलं नाही.

तीन महिने लोटले. ह्या अवधीत राहुलच्या आणखी एका नवीन नाटकाची घोषणा झाली. आधीच्या नाटकांचे प्रयोगही चालू होते.

अस्मिता मात्र दररोज त्याच्या आठवणीत झुरत होती. कणाकणाने तुटत होती. घरात गप्पगप्प रहात होती. एकांतात डॉक्टरांच्या प्रेमाला प्रतिसाद देत नव्हती. अनयकडेही तिचं लक्ष नव्हतं. त्याला माया, प्रेम ती देऊ शकत नव्हती. जनीच अनयचं सर्व काही पहात होती.

राहुलने एक दिवस अस्मिताला फोनवर विचारलं होतं, “अमू, तू सगळं सोडून पुन्हा माझ्याकडे येशील? आपण लग्न करू. तुझ्या आयुष्यातली ही मधली वर्ष पुसून टाक. सर्व सोडून मुंबईला माझा घरी - माझ्याकडे ये. किती वर्ष मी वाट पाहिली तुझी. आता हा विरह संपवूया. मी नाही राहू शकत तुझ्याशिवाय.”

ती म्हणाली, “राहुल, एवढं सोप्पं आहे का ते? असा मांडलेला संसार सोडून येणं... सर्व सोडून येणं...” ती फोनवर नि:स्तब्ध झाली.

तो म्हणाला, “एकदाच मनाचा धीर कर. ठरव आणि ये. सर्व सोडून...माझ्यासाठी...”

तिला काही सुचेना. ती म्हणाली, “मला थोडा विचार करू दे. अनय अजून खूप लहान आहे. आईची तब्येतही बरी नसते हल्ली फारशी. डॉक्टर त्यांच्या कामात बिझी... “

तिला वाक्य पूर्ण करू न देता तो म्हणाला होता, “म्हणूनच सांगतोय. तुझ्यासाठी डॉक्टरांना वेळ नाही. तू अशी मन मारूनच रहाणार आहेस का? आणि तू त्यांना सोडून आलीस तरीपण ते काहीही करणार नाहीत. त्यांच्यासारखी पापभीरू माणसं आपलं काहीही बिघडवणार नाहीत. आणि तुझ्या मुलाचं म्हणशील तर अजून लहान आहे तो. एकदा मन घट्ट करून त्याला आयुष्यातून दूर केलंस तर काही कठीण नाही.”

डॉक्टर त्या दिवशी लवकर घरी आले होते हे अस्मिताला माहीतच नव्हतं. घरातल्या दुसऱ्या खोलीतल्या कॉर्डलेस फोनवरून अस्मिता आणि राहुलचं हे सर्व बोलणं डॉक्टरांनी ऐकलं होतं. त्यांना जबरदस्त धक्का बसला. असं काही चालू असल्याची त्यांना सुतराम कल्पना नव्हती. ते पार हादरून गेले.

डॉक्टरांनी तिला त्यांच्या स्टडीमध्ये बोलावून घेतलं. शांत डोक्याने तिला सर्व विचारलं.

अस्मिताने सगळ्या गोष्टी उघड केल्यावर डॉक्टर म्हणाले होते, “तुला खरंच वाटतंय का की तो तुला सुखी ठेवेल? अजूनही विचार कर. अनय खूप लहान आहे. त्याला तुझी जरूर आहे. शिवाय मी - मलाही तुझी, तुझ्या असण्याची खूप सवय झालीय. मी माझ्या कामात व्यग्र असलो तरी तू सतत माझ्या मनात असतेस. तू आम्हाला सोडून गेलीस तर हे घर मोडून पडेल. मी खचून जाईन. नको जाऊस प्लीज. तू आम्हाला हवी आहेस.”

पण अस्मिताचा निर्धार झाला होता. राहुलचं प्रेम हेच तिचं दुखणं होतं. आता तिने निर्धारपूर्वक त्याला आपल्या अस्तित्वाचं केंद्र बनवलं होतं. ते काढून फेकणं तिला शक्य नव्हतं.

तिने आपण घर सोडून जात असल्याचं डॉक्टरांना स्पष्टच सांगितलं.

डॉक्टर तिला म्हणाले होते, “तू सर्व पाश तोडायचे ठरवलंच आहेस. आपलं पवित्र लग्नबंधन तुला रोखू शकत नाहीये. आपल्या मुलाची माया तुला अडवू शकत नाहीये. मग आमच्यासाठी एकच कर...” डॉक्टरांचा विध्द स्वर तिला जाणवला. ते पुढे म्हणाले होते, “आईच्या आणि अनयच्या नकळत जा. आणि जाताना गळ्यातलं मंगळसूत्र तेवढं देव्हाऱ्यात ठेवून जा...तिथे गेल्यावर तुझ्या निर्णयाचा तुला जर पश्चाताप झालाच तर...” पुढे आणखी काहीही न बोलता डॉक्टर त्यांच्या स्टडीरूम बाहेर पडले होते.

(क्रमशः)

**लीना माटे**

leenashining@gmail.com